।। बहुजन हिताय । बहुजन सुखाय ।।

४० वर्षापासून नियमितपणे प्रकाशित होणारे जनसामान्यांच्या प्रश्नांचा ध्यास असणारे एकमेव निर्भिड...

४१

साप्ताहिक

# माणदेश वार्ता

संस्थापक संपादक :
स्व.मारुती शिवाजी सोनवणे (एम.ए.)

स्थापना
६ नोव्हेंबर १९८३

RNI NO.
MAH/MAR/2004/16467

POSTAL REGD.
L2/RNP/PPR/04/2024-2026

FACEBOOK
MANDESH VARTA

सांगोला * जुने वर्ष ४१ वे नवीन वर्ष २१ वे * रविवार दि. २६ मे २०२४ * पाने ४ * मूल्य १ ₹ * अंक २० वा

# प्राचार्य महेश होनराव खून प्रकरण

## नव्याने तपास करण्याचे न्यायालयाचे सीबीआयला आदेश !

सांगोला : सांगोला येथील शोभनतारा झपके अध्यापक विद्यालयाचे प्राचार्य महेश होनराव खून प्रकरणाचा,सीबीआय ने सांगोला येथील कोर्टात सादर केलेला क्लोजर रिपोर्ट फेटाळून लावत,सदर प्रकरणातील मुळ फिर्यादी यांचे म्हणणे ग्राह्य धरून,प्राचार्य महेश होनराव खून प्रकरणाचा,पुढील तपास सुरू करून,नव्याने तपास करण्याचे आदेश सांगोला येथील मा.ज्यु. मॅजि.वर्ग-१ यांनी सीबीआय मुंबई यांना दिले आहेत.






प्राचार्य महेश होनराव यांचा १ मार्च २०१० रोजी अज्ञात व्यक्तीने खून केला होता. सुरुवातीला या प्रकरणाचा तपास सांगोल्याचे पोलिस निरीक्षक नितीन जगताप यांच्याकडे सोपविण्यात आला होता.पोलीस निरीक्षक नितीन जगताप हे महेश होनराव खून प्रकरणाचा समाधानकारक तपास करीत नसल्याची तक्रार महेश होनराव याची पत्नी रुपाली होनराव यांनी जिल्हा पोलिस अधीक्षकांकडे केली होती. त्यानुसार, उपविभागीय पोलिस अधिकारी डॉ. संजय स्वामी यांच्याकडे तपासाची जबाबदारी सोपवण्यात आली. स्वामी यांनी सदर प्रकरणाचा सहा महिने तपास केला. यावर मृत महेश होनराव याच्या पत्नी रूपाली यांनी तपास योग्य दिशेने होत नाही, या प्रकरणाचा तपास सीबीआयकडे वर्ग करावा, अशा मागणीची याचिका मुंबई उच्च न्यायालयात दाखल केली होती. उच्च न्यायालयाचे न्यायमूर्ती ए. एम. खानविलकर व ए. आर. जोशी यांच्या खंडपीठाने २१ जानेवारी २०११ रोजी हा तपास सीआयडीच्या साहाय्यक अधीक्षकांकडे वर्ग करण्याचे आदेश दिले होते.सीआयडीचे साहाय्यक अधीक्षक सदर खून प्रकरणाचा तपास करीत नसल्याने रुपाली होनराव यांनी पुन्हा उच्च न्यायालयात धाव घेत हा तपास सीबीआयकडे वर्ग करण्याची मागणी केली.त्यावर सुनावणी होऊन सीआयडीला हवा तेवढा वेळ देण्यात आला होता. परंतु सीआयडी तपासात दिरंगाई करत असल्याने. सीआयडी कडून सदर खून प्रकरणाचा तपास काढून घेवून,सदर खून प्रकरणाचा तपास सीबीआयकडे देण्याचा आदेश मुंबई उच्च न्यायालयाने दिला होता.

सीबीआयनेही महेश होनराव खून प्रकरणाचा तपास केला परंतु सीबीआय ला ही या खून प्रकरणाच्या तपासात यश प्राप्त झाले नाही.त्यामुळे सीबीआयने सांगोला येथील मे.कोर्टात सदर खून प्रकरणाचा क्लोजर रिपोर्ट सादर केला होता. या क्लोजर रिपोर्टवर मे.कोर्टाने सदर खून प्रकरणातील मुळ फिर्यादी यांना म्हणणे सादर करण्यास सांगितले होते. मुळ फिर्यादी यांनी म्हणणे देवून सदरचा क्लोजर रिपोर्ट स्वीकारण्यास नकार द्यावा अशी विनंती मे.कोर्टास केली होती.

सदर प्रकरणातील मुळ फिर्यादी यांचे म्हणणे ग्राह्य धरून,प्राचार्य महेश होनराव खून प्रकरणाचा,पुढील तपास सुरु करून,नव्याने तपास करण्याचे आदेश मा.ज्यु. मॅजि.वर्ग-१ सांगोला यांनी सीबीआय मुंबई यांना दिले आहेत.त्यामुळे तब्बल १४ वर्षांनंतर प्राचार्य महेश होनराव खून प्रकरणात नवा ट्विस्ट निर्माण झाला आहे.

## वाळू उपशाला महसूल विभागाची साथ ; मंथलीत अडकले महसूल प्रशासन

### तालुक्यातील अवैध वाळू उपसा बंद करावा अन्यथा तीव्र आंदोलन करू : हरिभाऊ पाटील

सांगोला : तालुक्यातून दररोज हजारो ब्रास खुलेआम वाळूचा उपसा होत आहे. अनधिकृत वाळू उत्खनन आणि वाहतुकीस प्रतिबंध असताना मंगळवेढा उपविभागीय अधिकारी व तहसीलदार यांच्या आशीर्वादाने अनधिकृत वाळू उत्खनन व वाहतूक जोरात सुरु आहे. संबंधित तलाठी, मंडल अधिकारी यांचा ही यामध्ये खारीचा वाटा असतो. वाळू व्यावसायिकांनी 'मंथली' द्या आणि कितीही वाळू उपसा करा, असा फतवा काही कर्मचारी व अधिकाऱ्यांनी काढल्याची चर्चा आहे. यामुळेच तालुक्यात महसूल विभागाच्या आशीर्वादाने दररोज हजारो ब्रास वाळू उपसा होत आहे. तालुक्यातील अवैद्य वाळू उपसा बंद करावा अन्यथा महसूल प्रशासनाच्या विरोधात तीव्र आंदोलन करू असा इशारा शिवसेनेचे नेते हरिभाऊ पाटील यांनी दिला आहे.

अनाधिकृत वाळू उपसा व बेकायदेशीर वाहतुकीबाबत नुक्तीच पार पडलेली सांगोल्याची आमसभा मोठ्या प्रमाणात गाजली होती. यामध्ये मध्यंतरी प्रांताधिकारी व तहसीलदार यांनी वाळू माफिया यांचा वाढदिवस साजरा केला याबाबत ही सोशल मीडियावरून प्रशासनाची नाचक्की झाली होती. यासह वेगवेगळ्या माध्यमातून अवैद्य वाळू उपसा हा विषय गाजत असताना प्रशासन दुर्लक्ष करीत असल्याने, सांगोला तालुक्यात वाळू उपसा जोमात सुरू आहे. महसूल प्रशासनाचा आशीर्वाद असल्याने वाळू माफिया नद्या नाले ओढे ओरबडून काढत आहेत. तालुक्यावर पाणीटंचाईचे मोठे संकट असताना, नदीपात्रातील वाळू उपसा बंद होताना दिसत नाही. वाळू उपसा बंद करणे यामध्ये संबंधित प्रशासनाला अपयश आले आहे. याबाबत तालुक्यातील नागरिकांनी निवेदनाद्वारे मागणी केली उपोषण केले तरी देखील प्रशासन गांभीर्याने घेत नाही. यावरून तालुक्यात संतापाची लाट सुरू आहे.

तालुक्यातून होत असलेल्या वाळू वाहतुकीची 'मंथली' गोळा करण्यासाठी महसूल कर्मचारी कार्यरत आहेत. तर त्यांच्या समवेत झिरो कर्मचारी मदत करीत असल्याने लाखो रुपयांची 'मंथली' वरिष्ठ अधिकाऱ्यांपासून ते कर्मचाऱ्यांच्या खिशात जाते. तहसील कार्यालयातील हालचालींवर लक्ष ठेवून वाहने पास करण्यासाठी काही युवक काम करीत असल्याने त्यांना ही या धंद्यातून चांगलाच मोबदला मिळत असल्याचे बोलले जात आहे. वाळू उपशाला महसूल विभागाची साथ मिळत असल्याने या विभागाने वाळू उपशासाठी वाहनांचे दरपत्रक तयार केले आहे. ट्रक, ट्रॅक्टर व डंपरसाठी वेगवेगळे दर तयार करण्यात आले आहेत. त्यातून दरमहा लाखो रुपयांचा मलिदा या वाळू व्यावसायिकांकडून महसूल विभागाला मिळत असल्यानेच वाळूचे दर कडाडल्याचे चित्र आहे. प्रांताधिकारी, तहसीलदार व महसूल चे अधिकारी मंथलीमध्ये अडकले असून महसूल च्या कृपाशीर्वादाने वाळू माफिया मस्तावला आहे. यावर प्रशासनाने तातडीने निर्बंध ला घालावेत आणि सांगोला तालुक्यातील वाळू उपसा बंद करावा अन्यथा, संबंधित प्रशासनाच्या विरोधात तीव्र आंदोलन करू असा इशारा शिवसेनेचे नेते हरिभाऊ पाटील यांनी दिला आहे.

## चांडोलेवाडी व वाड्यांवर पाण्याचे टँकर चालू करा

### नागरिकांची मागणी

सांगोला : सांगोला शहरातील चांडोलेवाडी व परिसरातील वाड्यांवर पाण्याचे टँकर सुरु करा, अशी मागणी चांडोलेवाडी परिसरातील नागरिकांच्या वतीने मुख्याधिकारी डॉ.सुधीर गवळी यांचेकडे निवेदनाद्वारे करण्यात आली.

चालू वर्षी पाऊस फार कमी प्रमाणात झाल्याने विहिरी व बोअर कोरडे पडले आहेत. तसेच सर्व वाड्या-वस्त्या या नगरपरिषद हद्दीत येत असून याठिकाणी अद्यापही नळाची सोय नाही त्यामुळे पिण्याच्या पाण्याची गैरसोय मोठ्या प्रमाणात भासत आहेत व पशुंचेही हाल पाण्याविना होत आहेत. तरी लवकरात लवकर टँकर सुरू करावेत, अशी मागणी चांडोलेवाडी परिसरातील सावंत वस्ती, गुसाळे वस्ती, इंगोले वस्ती, घाडगे वस्ती, शेंबडे वस्ती, सरगरवस्ती, चव्हाणवस्ती, मेटकरी वस्ती येथील नागरिकांच्या वतीने निवेदनाद्वारे मुख्याधिकारी यांच्याकडे करण्यात आली आहे.

# Edit Page



## संपादकीय......

जुने वर्ष-४१ वे
अंक-२७ वा

## वृत्तवाहिन्यांच्या बातम्यांचा कळस

प्रसारमाध्यमे हा भारतीय व्यवस्थेचा चौथा आधारस्तंभ मानला जातो. स्वातंत्र्यपूर्व काळापासून प्रसारमाध्यमांनी प्रत्येक वेळी महत्त्वाची भूमिका बजावली. त्या काळात प्रसारमाध्यमांच्या प्रत्येक शब्दाला अनन्यसाधारण महत्त्व होते. त्यांनी लोकांमध्ये स्वातंत्र्याबद्दल जागरुकता निर्माण करण्याचा प्रयत्न केला. काळानुसार प्रसारमाध्यमांचे स्वरुप बदलले. प्रसारमाध्यमांचे व्यावसायिकीकरण होऊ लागले. सध्याचे मीडियाचे चित्र तर फार विचित्र आहे. वाहिनी असो किंवा वृत्तपत्र, प्रत्येक माध्यमाने सध्याच्या काळात बेजबाबदारपणाचा कळस गाठला आहे. कोणत्या बातमीला महत्त्व द्यावे हे ठरवण्याची माध्यमांची पद्धतच बदलली आहे. इतर वाहिन्यांप्रमाणे वृत्तवाहिन्याही केवळ टीआरपीमागे सकाळी धावत असतात. महत्त्वाच्या घटनांकडे दुर्लक्ष करून अनावश्यक बातम्यांना महत्त्व दिले जाते.

सेलिब्रिटींचे खासगी आयुष्य हा प्रसारमाध्यमांसाठी खुसखुशीत ठरणारा विषय.सेलिब्रिटीजबद्दल दाखवल्या जाणाऱ्या बातम्यांमध्ये प्रत्यक्षात काहीच तथ्य नसते. किंबहुना, बातमी म्हणून त्यांना महत्त्व देण्यात काहीच अर्थ नाही. पण, प्रेक्षकांचे लक्ष वेधून घेणे आणि टीआरपी वाढवणे एवढेच लक्ष्य समोर ठेवल्याने प्रसारमाध्यमांना प्रत्येक घटनेमध्ये बातमीच दिसते.२००४ च्या निवडणुकांच्या दरम्यान वेगवेगळ्या घटनांचे कव्वालीच्या माध्यमातून विडंबन करण्यात आले. निवडणुकीसारखी महत्त्वाची बाब अशा पद्धतीने हाताळण्यात काय अर्थ आहे? गेल्या काही काळात स्टिंग ऑपरेशन हा वाहिन्यांसाठी हुकमी एक्का ठरत आहे. त्यामुळेच शक्ती कपूर, अमन वर्मा यांचे स्टिंग ऑपरेशन इंडिया टीव्हीने मीठ-मसाला लावून प्रेक्षकांसमोर मांडले. अशा बातम्या मांडताना प्रत्यक्ष परिस्थितीचे केवळ १० ते २० टक्के चित्रण केले जाते. इतर भाग व्यर्थ असतो. आरुषी प्रकरणातूनही प्रसारमाध्यमांचा बेजबाबदारपणा दिसून आला. हे प्रकरण नको तेवढे चिवडण्यात आले. मुंबईमध्ये दहशतवादी हलला झाल्यानंतर अतिरेक्यांबद्दल मिळणारी माहिती माध्यमे बिनदिक्कतपणे प्रसारित करत होती. अशी ती उघडपणे समोर आणण्यात केवढा मोठा धोका असू शकतो याचा माध्यमांनी सारासार विचार करण्याची गरज होती. दहशतवादी हल्ल्याच्या ठिकाणी एनएसजी कमांडोंची टीम आल्यावर माध्यमांना चित्रण थांबवायला सांगण्यात आले होते. पण, काहीतरी 'एक्सक्ल्युझिव्ह' दाखवण्याच्या लोभापायी प्रसारमाध्यमांना मोह आवरता आला नाही.वाहिन्यांवर अतिरेक यांचे संभाषणही दाखवलं जात होतं. पोलिसांच्या पुढे जाण्याचे नको ते धाडस प्रसारमाध्यमांचे प्रतिनिधी करत होते. वाहिन्यांचा हा धेडगुजरी कारभार पाहून शेवटी न्यायालयाने त्यांना कडक शब्दात समज दिली.भोपाळ गॅस प्रकरण माध्यमांनी अचानक चर्चेत आणले. ही बातमी किती महत्त्वाची आहे याचा त्यांना अचानक साक्षात्कार झाला असावा. प्रत्यक्षात ही घटना न घडली तेव्हा मात्र माध्यमांनी फारशी दखल घेतली नव्हती. अरबी समुद्रात दोन जहाजांची टक्कर झाल्यावर लाखो टन तेल समुद्रात पसरले. तेव्हा त्याबद्दल भारंभार बातम्या दाखवल्या गेल्या.

पूर्वी प्रसारमाध्यमांचा समाजावर मोठा प्रभाव होता. कारण, माध्यमे माहिती प्रबोधनाचे कार्य करत होती. आता प्रबोधनाचे काम कमी झाले आहे आणि व्यावसायिकतेचा बाजारूपणा सुरू झाला आहे. अतिलोभापायी नफेखोरी वाढली आहे. केवळ टीआरपी मिळवण्यासाठी किरकोळ बातम्यांना अवास्तव महत्त्व दिले जाते आणि महत्त्वाच्या बातम्या लोकांपर्यंत पोहोचतच नाहीत. त्यामुळे लोकांना त्यांची तीव्रताही कळत नाही. यामुळे विकृत पत्रकारितेला खतपाणी घातले जात आहे. छोट्या वाहिन्या अस्तित्वासाठी लढत असतात. त्यामुळे कोणतीही बातमी त्या उचलून धरतात. पण, बऱ्याच वर्षांपासून कार्यरत असलेल्या वाहिन्यांनीही असे वागावे म्हणजे कळस आहे.

### व्यंगचित्रे




-महादेव साने,मलकापूर ता.कराड जि.सातारा

### सुविचार

कोणत्याही राष्ट्राची मुख्य आशा त्याच्या तरुणांना दिल्या जाणाऱ्या उचित शिक्षणावर अवलंबून असतात.

### आरोग्य

## मॅच्युरिटीचे १० मानसिक संकेत

कायदा म्हणतो की एखादी व्यक्ती १८ व्या वर्षी प्रौढ बनते. कायद्याचा असा विश्वास आहे की तो आता प्रौढ झाला आहे आणि १८ वर्षावरील व्यक्ती आता त्याचे स्वतःचे निर्णय स्वतः घेऊ शकतो. त्याला मतदान करणे, मालमत्ता खरेदी करणे, ड्रायव्हिंग लायसन्स मिळणे असे अधिकार मिळतात. तसेच, चूक केल्याबद्दल त्यांना एखाद्या प्रौढ व्यक्तिंप्रमाणेच शिक्षादेखील मिळते. त्याला बाल न्याय कायदा लागू होत नाही आणि लहान वयामुळे मिळणाऱ्या सवलतीही बंद होतात.

पण १७ वर्षे ३६४ दिवस आणि १८ वर्षांच्या २४ तासात माणसाच्या शरीरात आणि मनात कोणते बदल घडतात, ज्यामुळे तो रातोरात मॅच्युअर होतो.यावर कायदेतज्ज्ञ वेगळे उत्तर देऊ शकतात. पण जर मानसशास्त्राच्या आधारे बोलायचे झाले तर, व्यक्ती १८ वर्षांचा होणे आणि प्रौढ होणे या दोन भिन्न गोष्टी आहेत.वय मॅच्युरिटीशी संबंधित आहे, परंतु केवळ वय हे एखाद्या व्यक्तीच्या मॅच्युरिटीचे लक्षण मानले जाऊ शकत नाही. एक १६ वर्षांचा किशोरवयीन देखील प्रौढ असू शकतो. दुसरीकडे, ३२ वर्षांची व्यक्ती मानसिक आणि भावनिकदृष्ट्या अमॅच्युअर असण्याची सर्व शक्यता असते.

मग कोण मॅच्युअर आणि कोण अमॅच्युअर हे कसे कळणार?

एखाद्या व्यक्तीची मॅच्युरिटी तपासण्यासाठी कोणतेही सर्वमान्य प्रमाण नाही, परंतु तज्ञ निश्चितपणे या लक्षणांना मॅच्युरिटीचे संकेत म्हणतात.

ही १० लक्षणे आहेत की जे तुम्ही मॅच्युअर असल्याचे सांगतात...

भावनिक न होता तुम्ही विचारपूर्वक निर्णय घ्यायला लागता.

तुम्ही आनंद किंवा दु:खात जास्त वाहवत जात नाहीत.

ईर्षेपेक्षा तुम्ही स्वत:वरच अधिक प्रेम करायला लागतात. जसे की सेल्फ लव.

रागावर नियंत्रण मिळवणे.

खर्च करण्यापूर्वी विचार करता.

प्रत्येकक्षणी तुम्हाला जबाबदारीची जाणीव होते.

माफी मागायलाही तुम्हाला कुठलाही कमीपणा वाटत नाही.

बोलण्याऐवजी तुम्ही दुसऱ्यांना ऐकणे अधिक पसंत करतात.

भावनांवर नियंत्रण ठेवायला शिकतात.

पाहिल्याक्षणी प्रेम होण्याची भावना तुमच्यामध्ये नसते.

कोणीही रातोरात मॅच्युअर होत नाही, पांढरे केस हे मॅच्युरिटीचे लक्षण नाही.

साधारणपणे, समाजात, मॅच्युरिटीचा संबंध थेट वयाशी जोडला जातो. एखादी व्यक्ती जितकी मोठी असेल तितका तो प्रौढ मानला जातो. काही लोक केसांच्या पांढरेपणावरून मॅच्युरिटी देखील ठरवतात.

तथापि, असा विचार पूर्णपणे योग्य नाही. तसेच मॅच्युरिटी ही तरुणपणात अचानक घडणारी गोष्ट नाही.

मॅच्युरिटी ट्रेनिंग एखाद्याचा जन्म होताच सुरू होते आणि २५ वर्षांत पूर्ण होते.

साप्ताहिक माणदेश वार्ता हे साप्ताहिक मालक, प्रकाशक, संपादक सोनवणे रोहित मारूती यांनी मुद्रक माळी अशोक बाळकृष्ण यांच्या बाळकृष्ण ऑफसेट प्रिंटर्स,नेहरू चौक, कोर्टा जवळ, सांगोला, जि. सोलापूर येथे छापून १२७९ अ भारत गल्ली, सांगोला, जि.सोलापूर येथे प्रसिद्ध केले. E-Mail- mandesh_varta@rediffmail.com
संपादक : सोनवणे रोहित मारूती (या अंकातील मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही.) . मो. ९४२०६६६५०१, ९०२८५९१४३१

# शाळेच्या पहिल्याच दिवशी विद्यार्थ्यांना गणवेश

## सोलापूरच्या ३१०० महिला शिवणार सव्वादोन लाख विद्यार्थ्यांचे गणवेश

सोलापूर : राज्याच्या शालेय शिक्षण विभागाकडून जिल्हा परिषदेसह स्थानिक स्वराज्य संस्थांच्या शाळांमधील इयत्ता पहिली ते आठवीपर्यंतच्या सर्वच विद्यार्थ्यांना प्रत्येकी दोन गणवेश मिळणार आहेत. यंदा प्रथमच निधीऐवजी महिला आर्थिक विकास महामंडळाला (मआविम) थेट कापड देऊन गणवेशाची शिलाई होणार आहेत. जिल्ह्यातील 'मआविम'कडील बचत गटांमधील सुमारे तीन हजार १०० महिला १५ दिवसांत गणवेश शिवणार आहेत. शाळेच्या पहिल्याच दिवशी विद्यार्थ्यांना एक गणवेश देण्याचे नियोजन आहे.




सोलापूर जिल्ह्यातील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या शाळांमधील दोन लाख २० हजार विद्यार्थ्यांना २०२४-२५ च्या शैक्षणिक वर्षात प्रत्येकी दोन गणवेश दिले जाणार आहेत. त्यात एक स्काऊट गाइडचा तर दुसरा नेहमीचाच गणवेश असणार आहे. शालेय शिक्षण विभागाच्या नव्या निर्णयानुसार बचत गटांमधील महिलांना रोजगार उपलब्ध होणार आहे.

एक गणवेश शिलाई केल्यावर १२० रुपये मिळणार आहेत. पहिल्या टप्प्यात महिला आर्थिक विकास महामंडळाकडील तीन हजार १०० महिलांकडे जिल्ह्यातील सव्वादोन लाख गणवेश शिलाईचे काम येणार आहे. त्यानंतर काही दिवसांनी पुन्हा दुसऱ्या गणवेशासाठी कापड येणार आहे. विशेष बाब म्हणजे यंदा विद्यार्थ्यांच्या अंदाजित मापानुसार राज्य स्तरावरूनच कटिंग केलेले कापड 'मआविम'ला पाठविले जाणार आहे. दोन दिवसांपूर्वी 'मआविम'च्या अधिकाऱ्यांसमवेत शालेय शिक्षण विभागाची ऑनलाइन बैठक पार पडली. त्यात चार पाच दिवसांत विद्यार्थ्यांच्या गणवेशाचे कापड येईल, असे सांगण्यात आले आहे. कटिंग करून आलेल्या कापडावरून जिल्ह्यातील महिला आर्थिक विकास महामंडळाच्या बचत गटांमधील एकतीसशे महिला दररोज १५ हजार गणवेशाची शिलाई करू शकतात, अशी माहिती जिल्हा समन्वयक सोमनाथ लामगुंडे यांनी दिली. जिल्ह्यातील दोन ते सव्वादोन लाख विद्यार्थ्यांचा प्रत्येकी एक गणवेश १५ दिवसांत शिवून पूर्ण होईल, असा विश्वास देखील त्यांनी यावेळी व्यक्त केला.

# कडलास येथे आढळला तरस; वनविभागाने पकडून निसर्गाच्या सानिध्यात केले मुक्त

सांगोला : सांगोला तालुक्यातील कडलास येथे १८ मे रोजी तरस हा वन्यप्राणी आढळला. या वन्यप्राण्यास सांगोला वनविभागाने पकडून कटफळ येथील वनक्षेत्रातील निसर्गाच्या सानिध्यात मुक्त केले असल्याची माहिती वनपरिक्षेत्र अधिकारी श्री.तुकाराम जाधवर यांनी दिली.

कडलास येथून दि.१८.०५.२०२४ रोजी सकाळी ९ वा. वनपरिक्षेत्र अधिकारी सांगोला यांना अज्ञात व्यक्तीने फोन करून सांगितले की, कडलास येथील माने वस्तीवर वन्यप्राणी तरस आलेला आहे. ताबडतोब कडलास येथे वनपरिक्षेत्र अधिकारी श्री.तुकाराम जाधवर, वनपाल श्री.एस.एल. मुंढे, वनरक्षक श्री.जी.बी.व्हरकटे, हंगामी वाहन चालक श्री.संकेत बाबर तसेच वनमजूर श्री.देवकते, सरगर व बोराडे यांनी शासकिय गाडीत लोखंडी पिंजरा घेवून कडलास येथे गेले. लोकांचा जमाव जास्त होता. जमावास शांत करून जाळीच्या सहाय्याने तरस वन्यप्राण्यास पकडून लोखंडी पिंजऱ्यामध्ये ठेवुन पंचनामा केला. कोणत्या ही प्रकारची जखम त्यास नव्हती. गावातील ग्रामस्थ, वस्तीवरील घाबरले होते. सदर वन्यप्राणी तरस कटफळ वनक्षेत्रात निसर्गाच्या सानिध्यात वनअधिकारी सांगोला यांनी शासकिय गाडीतून सोडला आहे. कडलास येथे वनविभागाचे वनक्षेत्र नसल्यामुळे कटफळ येथील वनक्षेत्रात सोडले आहे.




कोणत्या ही वन्यप्राण्यांची शिकार करण्यास बंदी आहे. एखाद्या व्यक्तीने वन्यप्राण्याची शिकार केल्यास वन्यजीव संरक्षण अधिनियम १९७२ या कायद्यानुसार त्या व्यक्तीवर कारवाई केली जाते. त्यामुळे कोणत्या ही वन्यप्राणीची शिकार करु नये. लोकांना आव्हान करण्यात येते की, वन्यप्राणी तरस, लांडगा, कोल्हा, ससा, काळविट, हरिण व इतर वन्यप्राणी एखाद्या गावात किंवा वस्तीवर जर आले तर त्यास कोणत्या प्रकारचा त्रास न देता ताबडतोब वनविभाग सांगोला यांच्याशी संपर्क मो. नं.९४२०३७८२७९, ९५५२४७४२४५, ९७६७३४४८८३, ९०२१९०९५५०, ७४९९३२८८३१ यांच्याशी संपर्क साधावा. पर्यावरणाचा समतोल राखण्यासाठी झाडांचे संरक्षण करणे व वन्यप्राण्यांचे संरक्षण करणे हे प्रत्येक नागरिकांचे कर्तव्य आहे. सदर वन्यप्राणी तरस एक पकडून कटफळ वनक्षेत्रात निसर्गाच्या सानिध्यात सोडण्यात आले.

याबाबत मार्गदर्शन मुख्य वनसंरक्षक पुणे श्री.एन.आर.प्रविण, उपनवसंरक्षक सोलापूर श्री.धैर्यशील पाटील, सहाय्यक वनसंरक्षक श्री.बी.जी.हाके यांचे मार्गदर्शन घेतले.

# भारतीय सशस्त्र सैन्यदलामध्ये अधिकारी पदाच्या पूर्व प्रशिक्षणाची मोफत सुवर्ण संधी

सोलापूर : भारतीय सैन्यदल, नौदल व वायुदलामध्ये अधिकारी पदावर भरती होण्यासाठी पात्र उमेदवारांना ेउलळपशव ऊशषशपलश डर्शीींळलश (उऊड) या परीक्षेची तयारी करून घेण्यासाठी नाशिक येथे नवयुवक व नवयुवयतींसाठी दिनांक १० जून ते २३ ऑगस्ट २०२४ या कालावधीत उऊड कोर्स आयोजित करण्यात येत आहे. सदर कोर्ससाठी प्रशिक्षणार्थी निवास, भोजन, आणि प्रशिक्षणाची नि:शुल्क सोय करण्यात आली आहे. तरी सोलापूर जिल्ह्यातील इच्छूक उमेदवारांनी सैन्य दलातील अधिकारी पदाची संधी उपभोगण्यासाठी जिल्हा सैनिक कल्याण कार्यालय, सोलापूर येथे दिनांक ३० मे २०२४ रोजी सकाळी ११.०० वाजता मुलाखतीस हजर रहावे. मुलाखतीस येते वेळी त्यांनी Department of Sainik Welfare, Pune (DSW) यांच्या वेबसाईट सर्च करून त्यामधील उऊड-६३ कोर्ससाठी प्रवेशपत्र व त्यासोबत असलेली परिशिष्टांची प्रिंट घेऊन व ते पुर्ण भरून सोबत घेऊन यावे.

सदर सी.डी.एस. वर्गामध्ये प्रवेश मिळण्यासाठी खाली नमूद पात्रता असणे आवश्यक आहे व त्यासंबंधीचे पात्रता प्रमाणपत्र प्रशिक्षण वर्गाला येतांना सोबत घेऊन यावेत. सदर प्रवेशासाठी उमेदवार हा कोणत्याची शाखेचा पदवीधर असावा, उमेदवार संघ लोकसेवा आयोग नवी दिल्ली यांचे मार्फत घेण्यात येणाऱ्या सी.डी.एस. या परिक्षेकरिता ऑनलाईनद्वारे अर्ज केलेला असावा.

अधिक माहितीसाठी प्रभारी अधिकारी, छात्रपूर्व प्रशिक्षण केंद्र, नाशिक रोड, नाशिक यांचा ई-मेल आयडी- training.pctcnashik@gmail.com व दुरध्वनी क्र. ०२५३-२४५१०३२ किंवा व्हॉट्अप क्र. ९१५६०७३३०६ (प्रवेशपत्र मिळविण्यासाठी) असून कार्यालयीन वेळेत प्रत्यक्ष अथवा दुरध्वनीवर संपर्क करावा, असे आवाहन जिल्हा सैनिक कल्याण अधिकारी, सोलापूर यांनी केले आहे.

# मर्चंट नेव्हीतील नोकरीचे आमीष दाखवून ९ लाख ९० हजार रुपयांची फसवणूक

## सांगोला पोलीस ठाण्यात ४ जणां विरुध्द गुन्हा दाखल

सांगोला : मर्चंट नेव्हीतील अधिकाऱ्यांशी ओळखी असल्याने तरुणांना महिना ७० हजार रुपये पगाराची नोकरी लावतो. मुलाखत पास नाही झाले तर पैसे परत देतो असे आमीष दाखवून मुलांना परराज्यातील वेगवेगळ्या ठिकाणी अन्न पाणी न देता कोंडून ठेवले. पाच तरुणांना नेव्हीतील नोकरीचे आमिष दाखवून ९ लाख ९० हजार रुपयांची फसवणूक केल्याची घटना उघडकीस आल्याने तालुक्यात खळबळ उडाली आहे. याप्रकरणी सविता चव्हाण यांनी दिलेल्या फिर्यादीवरून ४ जणांविरुध्द सांगोला पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

मुलांना शासकीय नोकरी लावण्यासाठी शेतकरी आई- वडिलांचे प्रयत्न सुरू असतात. मात्र, याच संधीचा गैरफायदा घेत मुलांना शासकीय नोकरी लावण्याचे आमिष दाखवून फसवणूक केल्याच्या अनेक घटना यापूर्वी उघडकीस आल्या आहेत. सोनंद गावातील दोघांनी फिर्यादी सविता चव्हाण यांचा मुलगा प्रतीक याची भेट घेवून महूद येथील दोघांच्या नेव्हीमधील अधिकाऱ्यांच्या ओळखी आहेत. त्यांच्या ओळखीने पैसे भरुन आम्ही मर्चंट नेव्हीमध्ये नोकरी लावतो असे सांगितले. महिना ७० हजार रुपये पगार मिळेल, मुलाखतीत पास झाला तर नोकरी मिळेल आणि नापास झाला तर तुमचे सर्व पैसे परत मिळतील असे आमिष दाखविले. मुलांना नोकरी मिळणार या आशेने सविता चव्हाण यांनी २ लाख २० हजार रुपये, बेबीताई चव्हाण यांनी २ लाख रुपये, कौशल्या चव्हाण यांनी २ लाख रुपये, नागर चव्हाण यांनी १ लाख ५० हजार रुपये, शशीकांत जाधव यांनी २ लाख २० हजार रुपये असे ९ लाख ९० हजार रुपये चौघांना दिले. पैसे घेतल्यावर त्यांनी मुलाना रोहतक (हरियाणा), जयपुर, दिल्ली या ठिकाणी घेवून जावून त्यांना वेगवेगळ्या ठिकाणी अन्न पाणी न देता कोंडून ठेवले, कुटुंबाशी संपर्क होवू दिला नाही. त्यानंतर नजर चुकवून मुलांनी मिळेल त्या मार्गाने गावी परत येवून कुटुंबाला घडलेला प्रकार सांगितला. यावरून नोकरीसाठी गेलेल्या तरुणांची फसवणूक झाल्याची खात्री झाली. याप्रकरणी सविता चव्हाण रा. सोनंद ता.सांगोला यांनी ४ जणांविरुध्द सांगोला पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे.

# सांगोला विद्यामंदिर ज्युनिअर कॉलेजचे एच.एस.सी.बोर्ड परीक्षेत उत्तुंग यश

## ९० % पेक्षा जास्त गुण मिळविणारे ४ विद्यार्थी तर ६४ विद्यार्थांना विशेष प्राविण्य




सांगोला : महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ,पुणे बोर्डाकडून फेब्रु/ मार्च,२०२४ मध्ये घेण्यात आलेल्या इ.१२ वी परीक्षेचा निकाल काल मंगळवार दि.२१ मे २०२४ रोजी ऑनलाईन जाहीर झाला.सदर परीक्षेत सांगोला तालुका शिक्षण प्रसारक मंडळ संचलित सांगोला विद्यामंदिर ज्युनिअर कॉलेज मधील इ.१२ वी शास्त्र, वाणिज्य व कला शाखेतील विद्यार्थ्यांनी उत्तुंग यश संपादन केले. यामध्ये ज्युनिअर कॉलेज शास्त्र शाखा ९८.३४%, वाणिज्य शाखा १०० % तर कला शाखेचा निकाल ९३.६८% व ज्युनिअर कॉलेजचा एकूण निकाल ९७.८७ % लागला आहे.

यामध्ये शास्त्र शाखा तनुजा ढोले ९३.१७% प्रथम क्रमांक, आदिती गायकवाड ९२.८३% द्वितीय क्रमांक, भक्ती घाडगे ९०.३३ तृतीय क्रमांक, वाणिज्य शाखा श्रेया दिघे ९०.५० % प्रथम क्रमांक, जुबिया शेख ८८.५०% द्वितीय क्रमांक, अनुष्का मिसाळ ८७.८३% तृतीय क्रमांक, कला शाखा प्रणाली होवाळ ८४.८३% प्रथम क्रमांक, आदित्य भस्मे ८०.६७% द्वितीय क्रमांक तर सना बागवान ७८.६७ % गुण मिळवत तृतीय क्रमांक मिळविला. वरील सर्व गुणवंत विद्यार्थ्यांचे व मार्गदर्शक शिक्षकांचे सांगोला तालुका शिक्षण प्रसारक मंडळ सांगोला अध्यक्ष प्रा.प्रबुद्धचंद्र झपके,सचिव म.शं.घोंगडे, सहसचिव प्रशुद्धचंद्र झपके, संस्था कार्यकारिणी सदस्य विश्वेश झपके यांच्यासह सर्व संस्था सदस्य, प्राचार्य गंगाधर घोंगडे, उपमुख्याध्यापक लक्ष्मण विधाते, उपप्राचार्य शहिदा सय्यद, पर्यवेक्षक अजय बारबोले, पोपट केदार, बिभिषण माने,शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी यांनी अभिनंदन केले.

सदर निकाल जाहीर झाल्यानंतर सांगोला तालुका शिक्षण प्रसारक मंडळ सांगोला संस्थेचे अध्यक्ष प्रा.प्रबुद्धचंद्र झपके यांचे हस्ते व सचिव म.शं घोंगडे प्राचार्य गंगाधर घोंगडे, उपमुख्याध्यापक लक्ष्मण विधाते, उपप्राचार्य शहिदा सय्यद,पर्यवेक्षक अजय बारबोले, पोपट केदार, बिभिषण माने यांचे हस्ते व ज्युनिअर कॉलेजमधील शिक्षक शिक्षकेत्तर कर्मचारी यांच्या उपस्थितीत वरील सर्व गुणवंत विद्यार्थ्यांना अभिनंदन पत्र देऊन त्यांचा पालकांसमवेत सत्कार करण्यात आला.

यावेळी संस्थाध्यक्ष प्रा.प्रबुद्धचंद्र झपके यांनी विद्यार्थी हेच शिल्पकार आहेत असे सांगत स्थापनेपासून विद्यामंदिरची गुणवत्ता कायम राखत यावर्षी मिळविलेल्या उत्तुंग यशाबद्दल विद्यार्थी, मार्गदर्शक शिक्षक व पालकांचे अभिनंदन केले. व पुढील शैक्षणिक वाटचालीस शुभेच्छा दिल्या. या सत्काराबद्दल पालकांनी संस्था, शाळा व शिक्षकांबद्दल कृतज्ञता व्यक्त केली.

# न्यू इंग्लिश स्कूल व ज्युनियर कॉलेज सांगोला चे बारावी बोर्ड परीक्षेत दैदीप्यमान यश

सांगोला : एच.एस. सी.परीक्षा फेब्रुवारी/ मार्च २०२४ चा निकाल जाहीर झाला. यामध्ये न्यू इंग्लिश स्कूल व ज्युनिअर कॉलेज सांगोला शास्त्र शाखा व कला शाखेचा एकूण शेकडा निकाल ९०.२२% लागला तर किमान कौशल्य विभागाचा एकूण निकाल ८१.९६% लागला.

शास्त्र शाखेमधून एकूण ७०० विद्यार्थी परीक्षेत बसले होते त्यापैकी ६६७ विद्यार्थी उत्तीर्ण झाले असून एकूण ८०% च्या वर दहा विद्यार्थ्यांनी यश संपादन केले असून शास्त्र शाखेचा एकूण निकाल ९५.२८% लागला आहे. शास्त्र शाखेतून कुमारी साळुंखे श्रेया अशोक हिने ९१.५०% गुण मिळवून प्रथम क्रमांक मिळवला. कुमार गाडेकर विराज सुरेश याने ८९ टक्के गुण मिळवून द्वितीय क्रमांक मिळवला, तर कुमारी सानिका शिवाजी केदार हिने ८८.१७ टक्के गुण मिळवून तृतीय क्रमांक मिळवला. कला शाखेमधून एकूण २५१ विद्यार्थी परीक्षेत बसले व १९१ विद्यार्थी उत्तीर्ण झाले.



शास्त्र शाख– श्रेया साळुंखे ९१.५० टक्केगुण प्रथम



कला शाखा – प्रशांत कांबळे, ७९ टक्केप्रथम



किमान कौशल्य– अभिजीत काटे ७५.३३ टक्केप्रथम

कला शाखेमधून कांबळे प्रशांत संजय याने ७९ टक्के गुण मिळवून प्रथम क्रमांक, जाधव साक्षी रमेश हिने ७७.००% गुण मिळवून द्वितीय क्रमांक तर गाडेकर साक्षी वसंत हिने ७५.३३% गुण मिळवून तृतीय क्रमांक मिळवला. किमान कौशल्य विभागामधून एकूण ६१ विद्यार्थी परीक्षेत बसले व एकूण ५० विद्यार्थी उत्तीर्ण झाले. किमान कौशल्य विभागातून काटे अभिजीत दत्तात्रय याने ७५.३३% गुण मिळवून प्रथम क्रमांक, सरगर दीदी ईश्वर हिने ७३.१७% गुण मिळवून द्वितीय क्रमांक, तर देशमुख अतिश नवनाथ याने ७०.८३% गुण मिळवत तृतीय क्रमांक मिळवला.

सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचे संस्था अध्यक्ष, संस्था सचिव व सर्व संस्था सदस्य, प्राचार्य नामदेव कोळेकर, उपप्रचार्य केशव माने, पर्यवेक्षक व सर्व शिक्षकांनी अभिनंदन केले.

# सांगोला तालुक्याचा बारावी निकाल ९५.३६ टक्के

सांगोला : महाराष्ट्र राज्य माध्यमिक आणि उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाकडून बारावीचा निकाल मंगळवार दि.२१ मे रोजी २०२३ रोजी दुपारी २ वाजता निकाल जाहीर करण्यात आला. यावर्षी सांगोला तालुक्याचा बारावीचा निकाल ९५.३६ टक्के लागला आहे.

तालुक्यातील सर्व शाळांचा निकाल पुढीलप्रमाणे– सांगोला विद्यामंदिर सांगोला– सायन्स ९८.३४ टक्के, आर्ट ९३.६८ टक्के, कॉमर्स १०० टक्के, न्यू इंग्लिश स्कूल सांगोला– सायन्स ९५.२८ टक्के, आर्ट ७६.०९ टक्के, किमान कौशल्य ८१.९६ टक्के, फॅबटेक पब्लिक सांगोला– सायन्स १०० टक्के, जवळे विद्यालय– सायन्स १०० टक्के, आर्ट ९१.३७ टक्के, कॉमर्स ९३.४७ टक्के, श्रीधर कन्या नाझरा– आर्ट ९८ टक्के, कॉमर्स १०० टक्के, श्री.छत्रपती शिवाजी हायस्कूल वाटंबरे– आर्ट १०० टक्के , मेडशिंगी हायस्कूल– आर्ट १०० टक्के, स.शा.लिगाडे ज्यु.कॉलेज अकोला– सायन्स ९७.०८ टक्के, सोनंद ज्यु कॉलेज–आर्ट ९१.६६ टक्के, श्री.शिवाजी विद्यालय महूद बु– सायन्स ९३.४५ टक्के, आर्ट ७६.०५ टक्के , विद्यामंदिर कोळा– सायन्स१०० टक्के, आर्ट १०० टक्के, सावित्रीबाई फुले सोनंद– सायन्स १०० टक्के, आर्ट १०० टक्के, नाझरा विद्यामंदिर– आर्ट ९४.४४ टक्के, कॉमर्स १०० टक्के, शिवणे उच्च माध्यमिक– सायन्स १०० टक्के, आर्ट ८३.७८ टक्के. श्रीराम हातीदआर्ट १०० टक्के, अभिजीत कदम विद्यालय मेथवडे– आर्ट ९४.५९ टक्के, मॉडर्न घेरडीआर्ट ९७.२९ टक्के, वाढेगाव ज्यु.कॉलेज– आर्ट ९७.१४ टक्के, कै.पांडुरंग आबा भांबुरे आलेगाव– सायन्स १०० टक्के, आर्ट ९५ टक्के, अजनाळे विद्यालय– सायन्स ८६.८० टक्के, आर्ट ८०.९५ टक्के, हलदहिवडी विद्यालय– आर्ट ९६.६६ टक्के, न्यू इंग्लिश स्कूल पाचेगाव बु – आर्ट १०० टक्के, जुनोनी विद्यालय – आर्ट ९७.१४ टक्के, विद्यामंदिर वाकी– सायन्स १०० टक्के . विद्यानिकेतन गौडवाडी– सायन्स १०० टक्के, आर्ट १०० %, बी.देसाई ज्यु.कॉलेज– सायन्स १०० टक्के, आर्ट ९४.४४ टक्के, विद्यामंदिर ज्यु.कॉ. सायन्स १०० टक्के, दिपक साळुंखे–पाटील सायन्स कॉलेज– सायन्स ९८.४० टक्के, गुरुकुल राजुरीसायन्स १०० टक्के, लक्ष्मीदेवी विद्यामंदिर –सायन्स १०० टक्के, फोनेक्स – सायन्स १०० टक्के, आर्ट १०० टक्के, यावर्षी सांगोला तालुक्यामधून ४ हजार ६४२ विद्यार्थ्यांपैकी ४५९९ विद्यार्थी परीक्षेस बसले हाते. यामध्ये डिस्टिक्शनमध्ये २८२ विद्यार्थी, ग्रेड १ मध्ये २०७१ विद्यार्थी, ग्रेड २ मध्ये १७६८ विद्यार्थी पास झाले असून पास ग्रेडमध्ये २६५ विद्यार्थी असे एकूण ४ हजार ३८६ विद्यार्थी उत्तीर्ण झाले आहेत.

# कडलास माण नदीजवळचा रस्ता त्वरित दुरुस्त करावा अन्यथा आठ दिवसांनी रस्ता रोको

सांगोला : सांगोला–कडलास दरम्यान माण नदीजवळचा त्वरीत रस्ता दुरुस्त करावा, अशी मागणी समस्त ग्रामस्थ कडलास, जवळा, सोनंद यांच्यावतीने तहसीलदार यांना निवेदनाद्वरे करण्यात आली.

माण नदीवरील सांगोला – कडलास रस्ता अत्यंत खराब झाला असून या रस्त्याची दुरुस्ती करण्यात यावी अन्यथा आम्ही आठ दिवसांनी रस्ता रोको करणार आहोत, याबाबतचे निवेदन तहसीलदार यांना देण्यात आले आहे.



यावेळी दत्ता टापरे, धनंजय लिगाडे जवळा, दत्तात्रय जाधव कडलास, संतोष पाटील पारे, गणेश महाकाळ, सुरेश पारसे इत्यादी ग्रामस्थ उपस्थित होते.

निर्भिड व सडेतोड बातम्या नियमित वाचा....
साप्ताहिक माणदेश वार्ता